
# कल्याण डोंबिवली व्हिजन

Year 08 : Issue 3 : Pages : 4 Kalyan, Dist. Thane : Tuesday 16 Nov To 22 Nov 2021 : Price 2.00 : RNI. No. MAHBIL/2014/56983

वर्ष : ०८ * अंक : ३ * पाने : ४ कल्याण, जि. ठाणे, * मंगळवार, १६ नोव्हेंबर ते २२ नोव्हेंबर २०२१ मूल्य : रु. २.००/- * नोंदणी क्रमांक एमएएचबी आयएल/२०१४/५६९८३

## महाराष्ट्रभूषण शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे यांचे दु:खद निधन

**पुणे (प्रतिनिधी) :** पद्मविभूषण आणि महाराष्ट्रभूषण शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे यांचे आज १५ नोव्हेंबर रोजी पहाटे निधन झाले. त्यांच्यावर वैकुंठ स्मशानभूमी येथे शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले.

शासनाच्यावतीने विभागीय आयुक्त सौरभ राव यांनी स्वर्गीय पुरंदरे यांच्या पार्थिवावर पुष्पचक्र अर्पण करून श्रद्धांजली वाहिली. यावेळी महापौर मुरलीधर मोहोळ, पिंपरी चिंचवडच्या महापौर उषा उर्फ माई ढोरे, खासदार गिरीष बापट, जिल्हाधिकारी डॉ.राजेश देशमुख, पोलीस आयुक्त अमिताभ गुप्ता, मुख्य कार्यकारी अधिकारी आयुष प्रसाद, सहपोलिस आयुक्त डॉ.रवींद्र शिसवे, अपर पोलीस आयुक्त राजेंद्र डहाळे, सांस्कृतिक कार्य विभागाच्यावतीने सहायक संचालक सुनीता आसवले यांनीही स्वर्गीय पुरंदरे यांच्या पार्थिवावर पुष्पचक्र अर्पण करून श्रद्धांजली वाहिली. तसेच खासदार अरविंद सावंत, पुणे महानगरपालिकेच्या उपमहापौर सुनिता वाडेकर, माजी मंत्री हर्षवर्धन पाटील आदींनी स्वर्गीय पुरंदरे यांच्या पार्थिवाचे अंत्यदर्शन घेऊन श्रद्धांजली वाहिली. संपूर्ण शासकीय इतमामात स्व. पुरंदरे यांच्या पार्थिवावर विद्युत दाहिनीत अंतिम संस्कार करण्यात आले.

पोलीस दलातर्फे त्यांना शोकप्रसंगीचे बिगूल वाजवून आणि बंदूकीच्या तीन फैरी झाडून सशस्त्र मानवंदना देण्यात आली. पार्थिवावर तिरंगा लपेटल्यानंतर मान्यवरांनी पुष्पचक्र वाहून श्रद्धांजली अर्पण केली. त्यानंतर त्यांचे सुपुत्र अमृत पुरंदरे आणि प्रसाद पुरंदरे यांच्या ताब्यात राष्ट्रध्वज सुपूर्द करण्यात आला. स्वर्गीय पुरंदरे यांना श्रद्धांजली देण्यासाठी कला, साहित्य, सांस्कृतिक, सामाजिक व विविध क्षेत्रातील नागरीक उपस्थित होते. यावेळी उपविभागीय अधिकारी संतोषकुमार देशमुख, पुणे शहर तहसीलदार राधिका बारटक्के आदी अधिकारी उपस्थित होते.

## खिडकाळी शिवमंदिर परिसराचे रूप पालटणार

### मंदिर आणि परिसराच्या सुशोभीकरणासाठी ५ कोटी निधी मंजूर



**ठाणे (प्रतिनिधी) :** कल्याण लोकसभा मतदारसंघातील अंबरनाथ येथील प्राचीन शिवमंदिराच्या सुशोभीकरणासाठी सुमारे ४३ कोटींचा भरघोस निधी प्राप्त करून घेतल्यानंतर खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या प्रयत्नाने आता शिळफाट्यालगत देसाई गाव येथील खिडकाळी शिव मंदिर आणि परिसराचे सुशोभिकरणासाठी ५ कोटी रूपयांचा निधी जाहीर करण्यात आला आहे. खिडकाळी येथील शिवमंदिराचा तीर्थ क्षेत्राच्या धर्तीवर विकास करण्यासाठी डॉ. श्रीकांत शिंदे प्रयत्नशील होते. ५ कोटींचा निधी उपलब्ध झाल्याने खिडकाळीच्या शिवमंदिर परिसराचे रूपडे पालटणार आहे.

ठाणे जिल्ह्यात स्वयंभू शिवलिंग असलेल्या शिवमंदिरांमध्ये अंबरनाथचे शिवमंदिर आणि देसाई गावाजवळील खिडकाळी शिवमंदिराचा उल्लेख सापडतो. कल्याण लोकसभा मतदारसंघाचे खासदार डॉ. श्रीकांत शिंदे मंदिरांच्या रूपाने मतदारसंघात असलेल्या प्राचीन वारशाला टिकवून ठेवण्यासाठी कायम आग्रही असतात. त्यातूनच काही महिन्यांपूर्वी अंबरनाथ येथील प्राचीन शिवमंदिराच्या विकासासाठी नगरविकास विभागाच्या माध्यमातून ४३ कोटी रूपयांचा भरघोस निधी उपलब्ध करून देण्यात त्यांना यश आले. त्यामुळे लवकरच पुरातत्व खात्याच्या मार्गदर्शनाखाली आणि देशातील अग्रगण्य आरेखाकांच्या मदतीने शिवमंदिराच्या सुशोभीकरणाचे काम सुरू केले जाणार आहे. अंबरनाथमधील शिवमंदिरानंतर कल्याण लोकसभा मतदारसंघात येणाऱ्या देसाई गावाजवळील खिडकाळी येथील प्राचीन शिवमंदिराची ओळख आहे. खिडकाळी येथील हे शिवलिंग स्वयंभू आहे. या शिवलिंगाचे दर्शन घेण्यासाठी हजारो भाविक दरवर्षी येत असतात. तसेच महाशिवरात्री उत्सवाच्या दरम्यान काशी, अयोध्या, उत्तराखंड येथून साधू संत येते वास्तव्यास येतात. स्वामी शिवानंद महाराज यांनी १९३४ मध्ये येथे (पान २ वर)

## मुलांमध्ये मराठी वाचनाची आवड पालकांनीच निर्माण केली पाहिजे



**कल्याण ( विनायक बेटावदकर) :** मराठी साहित्य हे अजिबात कालबाह्य झालेले नाही. पालकांनी आपल्या मुलांना उत्तम दर्जाचे, संस्कारक्षम, साहित्य असलेली मराठी भाषेतील पुस्तके आणून द्यावीत .त्यांच्यात वाचनाची आवड निर्माण करावी. .असे ज्येष्ठ साहित्यिक डॉ. गिरीश दाबके यांनी रविवारी सांगितले मुलांमध्ये मराठी वाचनाची आवड निर्माण करण्याची संपूर्ण जबाबदारी ही पालकांचीच आहे असेही ते म्हणाले.

ज्येष्ठ साहित्यिक सुहास शिरवळकर यांनी विपुल साहित्य निर्माण केले. त्यांचा फारमोठा वाचकवर्ग आहे. त्यांच्या पश्च्यात त्यांच्या पत्नी सुगंधा शिरवळकर त्यांचे पुत्र डॉ. प्रबोध शिरवळकर व त्यांच्या कुटुंबीयांनी त्यांचे प्रकाशित साहित्य १५८ वर्षांची वाचक परंपरा असलेल्या कल्याणच्या सार्वजनिक वाचनालयाला देण्याचे ठरवले. त्या निमित्ताने उपस्थित साहित्यिक ,पत्रकार, वाचक यांच्याशी उपस्थित पाहुण्यांनी संवाद साधला त्यावेळी मराठी भाषेबद्दल काहींनी चिंता व्यक्त केली. मराठी भाषा ही नामशेष होण्याच्या मार्गावर आहे. असे विचार यावेळी व्यक्त केले.

चर्चेत प्राजक्ता कल्याणकर, वाचनालयाचे भिकू बारस्कर, सुगंधा शिरवळकर ,पत्रकार विनायक बेटावदकर, डॉ. प्रबोध शिरवळकर श्री सम्राट शिरवळकर प्रवीणा पुरोहित आदींनी भाग घेतला. वाचन संस्कृती वाढवली पाहिजे. ती आपली सर्वाची जबाबदारी आहे. यासाठी वाचक मेळावे आयोजित करणे, गृहनिर्माण सोसायत्यातून साप्ताहिक स्वरुपात एकदा जमून सामुहिक वाचन करावे . शाळातील मुलांना शाळेतच चांगली मराठी पुस्तके उपलब्ध करून देऊन त्यांच्या वाचनासाठी स्वतंत्र वेळ दिला पाहिजे. शाळेतील मुले वाचानालयाशी जोडली गेली पाहिजेत

आपणही मराठी भाषेबद्दल जागरूक राहिले पाहिजे. त्यासाठी हस्त लिखिते, स्थानिक परिसरातील साहित्यिकांशी गप्पा. असे वेगवेगळे उपक्रम करावेत. एकमेकांची संभाषणं करताना मराठी शब्दांचाच वापर केला जाईल याकडे कटाक्षाने पहिले पाहिजे. आज परराज्यातून आलेली व्यक्ती आपल्या समोर आली तर आपण तिच्याशी हिंदीत किवा इंग्रजीत बोलणे सुरु करतो. ते थांबले पाहिजे. आपण मराठी बोललो तर तेही मराठी बोलतील.

वाचनालयांनी वाचकांशी संपर्क वाढवला पाहिजे त्याच्या आवडी निवडीवर अभ्यास करून त्यांना आवडीचे साहित्य उपलब्ध करून दिले पाहिजे. मराठीला आज मुळीच मरण नाही. पुस्तके व अन्य प्रकाशित साहित्य हे वाचकांपर्यंत कसे जाईल याचा विचार केला पाहिजे खरा वाचक हा वाचनालयातून तयार होतो. काहीही वाचा पण वाचा ही वृत्ती तरुणांनी अंगीकारली पाहिजे असे विचार यावेळी व्यक्त करण्यात आले.

## प्रतिक पाटील यांच्या परिसरात

### किल्ले बांधणी व रांगोळी स्पर्धेचे आयोजन



**डोंबिवली (प्रतिनिधी) :** प्रभाग क्रमांक ७९ सुनील नगर व परिसर प्रभाग क्रमांक ८० एकता नगर व परिसर प्रभाग क्रमांक ८१ गांधी नगर रामचंद्र नगर गणेश नगर आनंद नगर पांडुरंग वाडी व परिसर या ठिकाणी किल्ले बांधणी व रांगोळी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. कल्याण तालुका अधिकारी प्रतीक नामदेव पाटील यांनी आपल्या प्रभागात किल्ले बांधणी व रांगोळी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले.गेल्या तीन वर्षापासून या स्पर्धेचे आयोजन करतात. पण यावर्षी त्यांनी प्रभाग क्रमांक ७९, ८० ,८१ ,रामचंद्र नगर, गणेश नगर, आनंद नगर, पांडुरंग वाडी व परिसर येथे या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. मोठ्या संख्येने नागरिकांनी या स्पर्धेत भाग घेतला.

यावेळी विजेती स्पर्धकांना ट्रॉफी व सर्टिफिकेट देण्यात आले. प्रथम क्रमांक साई दर्शन संकुल, दुतिय क्रमांक माऊली कृपा सोसायटी, तृतीय क्रमांक मोरेश्वर कृपा सोसायटी, उत्तेजनार्थ बक्षीस चौतन्य सोसायटी असे देण्यात आले. रांगोळी स्पर्धेत प्रथम क्रमांक संजना साळवी, दुतिय क्रमांक संजना नरसाळे, तृतीय क्रमांक न्यू श्रीराम सोसायटी असे देण्यात आले.परीक्षक प्रभाकर निवळकर, अरुण हटकर यानी केले. प्रमुख पाहुणे उपशहर प्रमुख अरविंद जी बिरमोळे, उपशहर संघटक सुधाकर वायकुळे, युवा सेना शहर अधिकारी सागर जेधे आदी मान्यवर उपस्थित होते.

कल्याण तालुका अधिकारी प्रतीक नामदेव पाटील, विभाग प्रमुख रमेश कदम, महिला विभाग संघटक दीपिका कोळंबे, युवा विभाग अधिकारी मंदार गुरव, महिला शाखा संघटक श्रद्धा रहाटे, महिला शाखा संघटक मंदा वर्रे, महिला शाखा संघटक स्नेहा राणे , शाखा प्रमुख सचिन कोरलेकर ,शाखा प्रमुख सुधीर पोवार ,शाखाप्रमुख गणपत बाने, शाखाधिकारी अतिन परब, शाखाधिकारी सचिन कुलकर्णी, शाखाधिकारी अनिकेत ढोबळे समस्त शिवसैनिक युवासैनिक व महिला आघाडी यावेळी उपस्थित होते.

## कल्याणमधील बिर्ला शाळेबाहेर पालकांचं आंदोलन

### फी वाढीबाबत व्यक्त केला निषेध, फी वाढ कायदेशीर बिर्ला शाळा प्रशासनाच स्पष्टीकरण

**कल्याण (प्रतिनिधी) :** कल्याण मधील प्रसिद्ध असलेल्या बिर्ला शाळेबाहेर आज पालकांनी फी वाढी विरोधात काळ्या फिती बांधून आंदोलन केले .बिर्ला शाळा प्रशासनाने यंदाच्या वर्षी २० टक्के वाढ केली आहे ,ही फी वाढ बेकायदेशीर असल्याचा आरोप पालकांनी करत शाळेबाहेरच ठिय्या आंदोलन करत शाळा प्रशासनाचा निषेध व्यक्त केला. शाळेने फी वाढ मागे घ्यावी अशी मागणी केली.

या आंदोलनानंतर शाळा प्रशासनाने आंदोलन करणाऱ्या पालकांना चर्चेसाठी बोलावलं. या चर्चेत शाळा प्रशासनाने ही वाढ मागे घेण्यास (पान २ वर)



## संपादकीय...

# पालिकेच्या मालमत्तांवर मोबाइल टॉवर

उल्हासनगर महापालिकेची आर्थिक स्थिती खालावली असून उत्पन्नवाढीच्या विविध मार्गांची चाचपणी महापालिका करत असताना आता शहरातील महापालिकेच्या ताब्यात असलेल्या विविध मालमत्तांपैकी मोकळी मैदाने, समाज मंदिरे अशा वास्तूंच्या आवारात मोबाइल टॉवर उभारण्याचा निर्णय स्थायी समितीने घेतला आहे. याबाबतचा प्रस्ताव नुकताच स्थायी समितीच्या पार पडलेल्या बैठकीत सादर करण्यात आला. महासभेत या प्रस्तावाला मंजुरी मिळाल्यानंतर भविष्यात पालिकेच्या मालमत्तांच्या आवारात मोबाइल टॉवरचे जाळे पाहायला मिळणार आहे. उल्हासनगर महापालिकेने उत्पन्नाचे स्रोत वाढवण्याचे विविध माध्यमांतून केलेले प्रयत्न फोल ठरताना दिसत आहेत. त्यात मालमत्ता कर आणि इतर माध्यमातून मिळणारे उत्पन्नाचे प्रमाण नगण्य आहे. त्यामुळे उत्पन्न वाढवण्यासाठी महापालिकेने विविध पर्यायांसाठी हालचाली सुरू केल्या आहेत. शहरातील खासगी इमारतींवर आणि खासगी भूखंडावर मोबाइल टॉवर उभारण्यासाठी महापालिका परवानगी देते. मात्र, गेल्या काही काळात शहरातील धोकादायक इमारतींची संख्या वाढली असून मोबाइल टॉवरचा भार धोकादायक इमारतींवर असल्याने इमारतांनी धोका उद्भवण्याच्या भीतीने अनेक इमारतींवरील मोबाइल टॉवर काढण्याचे आदेश महापालिकेने दिले होते. त्यामुळे मोबाइल टॉवर कंपन्यांची अडचण झाली होती. यावर पर्याय म्हणून मोबाइल कंपन्यांची सोय आणि महापालिकेचे उत्पन्न वाढवण्यासाठी पालिकेने पुढाकार घेतला आहे. मोबाइल कंपन्यांचे टॉवर उभारण्याच्या माध्यमातून दर महिन्याला चांगला मोबदला मिळत असतो. त्यातून खासगी इमारतींच्या देखभाल दुरुस्ती आणि इतर खर्च निघत असतो. त्यामुळे महापालिकेने आपल्या मालकीच्या मालमत्तांच्या जागांवर मोबाइल कंपन्यांच्या टॉवरला परवानगी देण्याच्या हालचाली सुरू केल्या आहेत. यासाठी महापालिकेने शहरातील मोकळी मैदाने, समाजमंदिरे आणि इतर एकूण अशा १०५५ वास्तूंच्या ठिकाणी टॉवर उभारण्याबाबतचा प्रस्ताव नुकताच पार पडलेल्या स्थायी समितीच्या बैठकीत सादर केला आहे. त्यामुळे स्थायी समितीतही या प्रस्तावाला सदस्यांनी सकारात्मकता दर्शवली आहे. महापालिकेच्या उत्पन्न वाढीच्या दृष्टीने हा विषय महत्त्वाचा असल्याने येत्या महासभेत या प्रस्तावाला मान्यता मिळाल्यास त्यातून महापालिकेचे उत्पन्न वाढण्यास मदत होईल, असे स्थायी समिती सभापती दीपक सिरवानी यांनी सांगितले आहे. या विषयांतर्गत मोबाइल कंपन्यांना टॉवरसाठी भाडे आकारणीबाबत एक वर्षाच्या काळात प्रचलित रेडी रेकनरच्या दरानुसार जमीन मूल्यांच्या आठ टक्के प्रतिवर्ष मासिक भाडे अथवा प्रतिमहिना १० हजार रुपये किंवा यापैकी जे जास्त असेल तो दर आकारण्यात येईल. तसेच कराराच्या एक वर्षानंतर नूतनीकरणासाठी १० टक्के वाढ करत ती रक्कम आकारली जाईल, असेही सिरवानी यांनी सांगितले.

# प्रा.डॉ. दिनेश गुप्ता यांनी दिल्या हस्तलिखित दिवाळीच्या शुभेच्छा संदेश

**कल्याण (प्रतिनिधी):** ३ तासात राज्याच्या २९ मुख्यमंत्री, राष्ट्रपती आणि पंतप्रधानांना पत्र लिहून तरुणांना शब्दांनी नव्हे तर कामाने प्रेरित केले. आजच्या झटपट युगात पोस्ट कार्डचा ट्रेंड लुप्त झाला आहे. लोक लिहिणे, पोस्ट करणे आणि प्रतीक्षा करणे विसरत आहेत. डिजिटल युगात



हस्ताक्षराचा संदेश देण्यासाठी प्रा.डॉ. दिनेश गुप्ता यांनी २९ राज्यांचे मुख्यमंत्री, महामहिम राष्ट्रपती, उपराष्ट्रपती आणि पंतप्रधान यांना हस्तलिखित दिवाळीच्या शुभेच्छा संदेश लिहून त्यांनी राज्याचे मुख्यमंत्री, महामहिम राष्ट्रपती, उपराष्ट्रपती आणि पंतप्रधान यांना हस्तलिखित दिवाळी शुभेच्छा संदेश लिहिले. कल्याण भारतीय टीव्ही वाहिनीच्या कार्यालयात सलग तीन तास बसून त्यांनी हे कार्य पूर्ण केले. अशा प्रकारे अभिनंदनही करता येईल, हा संदेश त्यांनी या माध्यमातून देण्याचा प्रयत्न केला आहे.

**संस्थापक संपादक : राजेंद्र वखरे**
**संपादक : महादेव पंजाबी**
**उप संपादिका : वैष्णवी माळी**

पीआरबी कायद्यानुसार संपादकीय व वृत्तपत्रातील मजकुर, जाहिरातीची कायदेशीर संपूर्ण जबाबदारी महादेव पंजाबी यांच्यावर राहील. कायदेशीर बाबीसाठी न्यायक्षेत्र कल्याण.

साप्ताहिकात प्रकाशित झालेल्या वृत्त व इतर मजकूराबाबत काही वाद असल्यास साप्ताहिक प्रकाशित झालेल्या तारखेपासून पंधरा दिवसाच्या आत संबंधितांनी त्याची नोंद घ्यावी. त्यानंतर आलेल्या तक्रारीची जबाबदारी व्यवस्थापनाची नसेल. तसेच वार्ताहर, लेखक यांच्या मताशी संपादक व व्यवस्थापन जबाबदार असेलच असे नाही.

# निसर्ग प्रेमी, प्राणी, पक्षी अभ्यासकांना केडीएमसीची निसर्ग उद्यानाची भेट

साधारणपणे १९५० ते ६० च्या दशाकाकडे आपणा पहिले तर कल्याणाचा पूर्व भाग, पश्चिमेकडचा आधारवाडी, वाडेघर, सापाड उंबर्डे मोहना अटाळी असे ग्रुप ग्रामपंचायतींचे क्षेत्र, गोदरेज हिलचा डोंगरपट्टीचा भाग या सर्व भागात काही कच्ची बांधकामे असलेली मुळच्या रहिवाशांची घरे सोडली तर बाकी सर्व बांधकामे शेतकऱ्यांनी बांधलेल्या झोपडीवजा घरांचीच होती. शेती व दुधाचाच मुख्य व्यवसाय असल्याने हा सर्व परिसर घनदाट झाडांनी वेढलेला असायचा. या झाडांवर निरनिराळे पक्षी पहायला मिळत. मुगुस, खार, चिमण्या, कोकीळ, यांचा मुक्त संचार असायचा. कल्याण पश्चिमेला गावात शहरी भागात राहणाऱ्या महिला कोकीळ व्रताच्या काळात कोकिळेचा आवाज ऐकण्यासाठी काळातलाव भागात येत. आज हे सर्व बदलले आहे



काळातलाव, बेतूरकरपाडा भागात बांधकाम व्यवसायिकांची मोठ्या प्रमाणावर बांधकामे झाल्याने पूर्वीची नैसर्गिक जंगले नष्ट झालीत. या सर्व भागाचे शहरीकरण झाले. लोकसंख्या वाढली नगर पालिकेचे महापालिकेत रुपांतर होऊन कल्याण डोंबिवली शहरे एक झाली. शहर विकासाच्या अनेक योजना आल्या. त्यात अपरिहार्यपणे मोठी झाडे तोडावी लागली.

कल्याणला ऐतिहासिक वारसा लाभला आहे. या विकास कामात अनेक जुनी बांधकामे नष्ट झाली. त्यात पारशी लोकांची पुरातन विहीर ( मृतदेह ठेवायची जागा) अनेक जुनी महत्व असलेली बांधकामे वाडे, यांचा समावेश होता. सध्या टांगे नष्ट होण्याच्या मार्गावर आहे. पण या सर्वाहून महत्वाचे शहरी करणात योजना साकारताना मुळची वनसंपदा नष्ट झाली. महापालिकेने ज्या काही चांगल्या गोष्टी केल्या त्यात विकास कामात एक झाड तोडले तर त्या बदल्यात

**विनायक बेटावदकर**
**९६१९१४८२६०**

नवीन पाच झाडे लावण्याचा निर्णय घेतला तरी ही झाडे कुठे लावायची ? त्यासाठी मोकळी जमीन कोठून आणणार ? असे अनेक प्रश्न होते. पण तेही प्रश्न महापालिकेच्या शहरांबद्दल आस्था असणाऱ्या आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी आपल्या तज्ञ अभियंत्याच्या सहाय्याने सोडवले.

शहरातील निरनिराळ्या भागांना जोडणारा रिंगरुट हा एक मोठा प्रकल्प सध्या साकारत आहे. त्या प्रकल्पात तोडण्यात आलेल्या झाडांच्या बदल्यात झाडे लावण्यासाठी आंबिवली परिसरातील १५ हेक्टर वनखात्याची जागा महापालिकेने मिळवली. नवीन झाडे लावताना महापालिकेने फुलपाखरू उद्यान, छोटे पर्यटनक्षेत्र, पक्षी उद्यान, ,वटवाघुळ खारुताई, यांना आवडणाऱ्या झाडांची निवड केली.अर्थात असा प्रयोग यापूर्वी कल्याणातीलच कल्याण जनता सहकारी बँकेने टिटवाळा गोवेली मार्गावर केल्याचे अनेकांना आठवत असेल. त्याचे त्या वेळी खूप कौतुक झाले. पण ती जागा वनविभागाची असल्याने तो प्रकल्प पूर्ण होऊ शकला नाही. असे जनता बँकेच्या काही पदाधिकाऱ्यांचे म्हणणे आहे. आता महापालिकेनेच १५ हेक्टर जागेत गेल्या दोन वर्षापासून झाडे लावण्यास सुरवात केली .ती झाडे आता चांगली वाढली आहेत. इतकेच नव्हे तर त्या झाडांवर विविध प्राणी पक्षी मुक्कामाला आले आहेत. त्यांना अतिउत्साही, लोकांकडून त्रास होऊ नये म्हणून सुरक्षा रक्षकांचीही व्यवस्था केली आहे. टिटवाळा हे मुळात निसर्गरम्य धार्मिक स्थळ म्हणून प्रसिद्ध आहे. पूर्वी गणपती मंदिराच्या परिसरात चांगली झाडी ,नैसर्गिक तलाव होता सध्या तलाव आहे पण झाडी नाही. आता या सर्वाना या नव्याने होणाऱ्या पक्षी प्राणी उद्यानाची भर पडून हा सर्व भाग एक चांगले पर्यटन स्थळ म्हणून निर्माण होऊ शकेल. या उद्यानात ३८ एकर जमिनीत बकुळ कारंज, कडुलिंब, पेरू, मोहगणी, जांभूळ, आंबा, चेरी, कादंब कांचन, बदाम, वड, पिंपळ, आंबा काजू, सिसम. फणस, चिंच, कैलासपती, आवळा, या सारख्या सुमारे २५ प्रकारांची १५ हजार झाडांची लागवड केली आहे. महापालिकेच्या परिवहन विभागाने कल्याण शहरातील व परिसरातील ऐतिहासिक स्थळे, दाखवण्याचा एक उपक्रम जाहीर केला आहे. परिवहन सेवेची नेहमीची बससेवा वेळापत्रका प्रमाणे धावत नाही. त्याची अनेक कारणे दिली जात आहेत. पण या सेवेच्या टिटवाळा सिद्धी विनायक मंदिराचा समावेश केला तर टिटवाळा व हे नव्याने झालेल्या उद्यानाचा संयुक्तपणे पर्यटन क्षेत्र म्हणून विकास करता येईल. त्यामुळे या कामात खड्डे नसलेले चांगले रस्ते ,तसेच स्थानिक तरुणांना उपहार गृहे, दुकाने, महापालिकेनेच तयार करून दिली तर अवैध विक्रेत्यांना आळा बसू शकेल. रिक्षा ,खासगी बससेवा ,चांगल्या प्रकारे चालू शकतील तत्पुरत्या विश्रांती गृहांची सोय व वनातील झाडांपासून फळे,फुलांच्या रूपाने मिळणारे उत्पन्न महापालिकेला ,स्थानिक तरुणांना रोजगार उपलब्ध होऊ शकेल. सध्या या उद्यानात फुलपाखरे, छोट्या पक्षांचे मोठ्या प्रमाणात आगमन झाले आहे. त्यांच्यासाठी निरनिराळ्या भागात पाण्याची सोय होणे गरजेचे आहे. या उद्यानाचा पक्षी, प्राणी वनस्पती अभ्यासकांना चागला उपयोग होऊ शकेल.

# मा. नगरसेवक महेश गायकवाड यांची वचनपूर्ती सोहळ्यात विविध लोकार्पण

**कल्याण (प्रतिनिधी):** शिवसेना प्रभाग क्रमांक ८८ संतोष नगर तिसगाव चे कार्यसम्राट नगरसेवक महेश दशरथ गायकवाड यांच्या स्व खर्चातून उभारण्यात आलेल्या रचना पार्क संकुलाच्या प्रवेश द्वाराचे उद्घाटन करण्यात आले. तसेच कल्याण लोकसभा खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या विशेष निधीतून संतोष नगर तिसगाव प्रभागातील लावण्यात आलेल्या नवीन पथदिव्यांचा लोकार्पण सोहळा कल्याण जिल्हा प्रमुख गोपाळ लांडगे यांच्या शुभ हस्ते पार पडला.



संतोष नगर परिसरात रचना पार्क संकुलामध्ये मोठ्या प्रमाणात रहिवाशी राहत असून तेथे पथदिवे नव्हते याबाबत रहिवाश्यांनी महेश गायकवाड यांच्याकडे पाठपुरावा केला असता त्यांनी स्व खर्चातून नागरिकांसाठी पथदिव्यांची सोय करून दिली आहे. महेश गायकवाड यांनी कोरोणा काळात प्रभागातीलच नव्हे तर संपूर्ण महाराष्ट्रातील नागरिकांना मदत केली आहे, महाराष्ट्रातील कोणत्या गावात किंवा शहरात संकट आले तर गोरगरिबांच्या मदतीसाठी कल्याण पूर्वेतील महेश गायकवाड हे नेहमी त्यांच्या मदतीसाठी धावून जातात. त्याचीच पोचपावती त्यांना आयोजित कार्यक्रमात नागरिकांनी केलेल्या कौतुकातून मिळाली.

यावेळी जिल्हाप्रमुख गोपाळ लांडगे यांच्यासह कल्याण उपशहर संघटक दिलीप दाखिनकर,शाखाप्रमुख प्रशांत बोटे,अजित चौधुले,समाजसेवक कृष्णा पाटील, समाजसेवक निलेश रसाळ यांच्यासह महिला आघाडी शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**....पान १ वरुन..खिडकाळी शिवमंदिर**

समाधी घेतली असून खिडकाळी मंदिर हे भाविकांसाठी तीर्थस्थान आहे. तसेच खिडकाळी मंदिरास तीर्थक्षेत्राचा दर्जा मिळण्यासाठी सदर ट्रस्टमार्फत मागणी देखील केली आहे. खिडकाळी येथील शिवमंदिरास तीर्थ क्षेत्राचा दर्जा मिळवण्यासाठी खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांनी राज्याचे पर्यटन मंत्री आदित्य ठाकरे यांच्याकडे मागणी केली होती. शासनाच्या तीर्थक्षेत्र विकास व पर्यटन संबंधी विविध योजनांमार्फत या मंदीराचा तसेच आजूबाजूच्या परिसराचा विकास होईल आणि भविष्यात एक उत्तम तीर्थक्षेत्र व पर्यटन स्थळ म्हणून नावारूपाला येईल त्यामुळे यासाठी भरघोस निधी मिळावी यासाठी नगरविकास मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे डॉ. श्रीकांत शिंदे यांनी निधी देण्याची मागणी केली होती. या मागणीला अखेर यश आले असून नगरविकास विभागातर्फे खिडकाळी शिवमंदिराच्या आणि परिसराच्या सुशोभीकरणासाठी ५ कोटी रूपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. या निधीमुळे खिडकाळी येथील शिवमंदिर आणि परिसराचे रूप पालटणार आहे.

**....पान १ वरुन..पालकांचं आंदोलन**

नकार दिल्याची माहिती पालकांनी दिली . त्यामुळे यापुढेही शाळे विरोधात आंदोलन करणार असल्याचं आपली भूमिका पालकांनी स्पष्ट केली. शाळेच्या या निर्णया विरोधात शिक्षण मंत्र्यांसह न्यायालयात धाव घेनार असल्याचा इशारा पालकांनी दिला. तर याबाबत शाळा प्रशासनाने कोरोना काळात २०१९ पासून आम्ही कोणतीही फी वाढ केली नव्हती .यंदा नियमानुसार फी वाढ केली आहे .ज्या पालकांची आर्थिक परिस्थिती नाही त्याना फी मध्ये सवलत देण्यात आली आहे तसेच चार ते सहा टप्प्यात फी भरण्याची मुभा दिली आहे. फी वाढी संदर्भात न्यायालयात प्रकरण असून न्यायालयाचा जो निर्णय असेल तो आम्हाला मान्य असल्याचे शाळा व्यवस्थापनाकडून सांगण्यात आले .

# आमदार गणपत गायकवाड यांच्या माध्यमातून ईश्रम कार्डचे वाटप

## जनता दरबारात विद्यार्थ्यांच्या शाळेच्या फि चेकचे वाटप

**कल्याण (प्रतिनिधी) :** आमदार गणपत गायकवाड हे असतात. या रविवारी आमदार गणपत गायकवाड यांनी जनता दरबार मध्ये जनता दरबार च्या माध्यमातून सर्वसामान्यांच्या समस्या



आपल्या विधानसभा क्षेत्रात नेहमीच विविध शासकीय उपक्रम राबवत असतात .. केंद्र शासनाच्या ई-श्रम कार्डचे वाटप तसेच शालेय विद्यार्थ्यांच्या फी चे वाटपही रविवारी करण्यात आले...

प्रत्येक आठवड्याच्या रविवारी व सोमवारी सर्वसामान्य नागरिकांना प्रत्यक्ष भेटून त्यांच्या समस्या जाणून घेण्याचा प्रयत्न आमदार गणपत गायकवाड त्यांच्या कार्यालयात करीत केंद्र सरकारच्या ई-श्रम कार्डचे वाटप केले. गेल्या एक महिन्यापासून आमदार गणपत गायकवाड यांच्या कार्यालयामध्ये ई-श्रम कार्ड हे मोफत बनवले जात होते. आज या ई-श्रम कार्डचे आमदार गणपत गायकवाड यांच्या हस्ते वाटप करण्यात आले यावेळी अनेक ई-श्रम धारकांनी उपस्थिती दर्शवली, . सर्व सामान्यांच्या आर्थिक दुर्बल विद्यार्थ्यांच्या फीच्या चेक्सचे वाटपही याच वेळी करण्यात आले. जाणून घेऊन त्यावर त्वरित तोडगा काढण्याचा प्रयत्नही या वेळी आमदार गणपत गायकवाड यांनी केला.. यावेळी आमदार गणपत गायकवाड यांच्या सोबत भारतीय जनता पार्टी कल्याण पूर्व मंडळ अध्यक्ष संजय मोरे, माजी नगरसेवक अभिमन्यू गायकवाड, नितेश म्हात्रे, राखी बारोड, अनिल घ्टम, गुड्डू खान नितीन शिंदे, सौरभ सिंग, अनेक कार्यकर्ते उपस्थित होते.

## ग प्रभागात डी.एन.सी. शाळेच्या मागे सुरु असलेले

# अनधिकृत इमारतीचे बांधकाम निष्कासनाची धडक कारवाई

**कल्याण (प्रतिनिधी) :** महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांचे निर्देशानुसार, ग प्रभाग सहा. आयुक्त रत्नप्रभा कांबळे यांनी डोंबिवली पूर्व येथील घ्डी.एन.सी. शाळेच्या मागील शिरसाट यांच्या ळ१ इमारतीचे अनधिकृत बांधकाम निष्कासनाची धडक कारवाई आज केली.




सदर कारवाई महापालिका अतिक्रमण निर्मुलन विभागाचे कर्मचारी, महापालिका पोलिस कर्मचारी आणि १ पोकलेन मशिनच्या सहायाने करण्यात आली.

# कल्याणात साकारली सिंहगड किल्ल्याची प्रतिकृती

## समाजसेवक सचिन मारुती शिरसाठ यांच्यासोबत विविध कलाप्रेमी आणि शिवप्रेमींनी लावली हजेरी, ओमकार ने साकारलेल्या प्रतिकृतीचे सर्वांनी केले कौतुक



**कल्याण (प्रतिनिधी) :**भव्य दिव्य अशा सिंहगड किल्ल्याची प्रतिकृती ओमकार त्याने कल्याण पश्चिमेतील ठाणकर पाडा येथे उभारली आहे. या सिंहगड किल्ल्याच्या प्रतिकृतीस शहरातील व परिसरातील शिवप्रेमी आवर्जून भेटी देत त्यांच्या कलाकृतीचे कौतुक करीत आहेत. सिंहगड किल्ल्याच्या हुबेहूब प्रतीकात्मक किल्ला ओमकार याने उभारल्याने कल्याणकरांना इथेच प्रत्यक्ष सिंहगड दर्शन होत असल्याची अनुभूती मिळत आहे. ओमकार याचा उपक्रम हा सर्वत्र कुतूहलाचा विषय ठरत आहे. ते भव्य दिव्य असा सिंहगड किल्ला साकारल्याने खऱ्याखुऱ्या किल्ल्याचे कल्याणकर वासियांना प्रत्यक्ष दर्शन होईल अशा स्वरूपाचे या किल्ल्याची निर्मिती करण्यात आली आहे. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या असलेले अनेक ऐतिहासिक बाबी या किल्ल्यामध्ये दर्शवण्यात आले आहेत.

जसे की तोफखाने, कल्याण दरवाजा, पुणे दरवाजा, तानाजी मालुसरे स्मारक, राजाराम महाराज यांची समाधी अशा अनेक कलात्मक ती या किल्ल्यात दाखविल्या आहेत. तब्बल सात दिवसांच्या अथक परिश्रमातून या किल्ल्याची उभारणी केली असून ओमकार आणि त्याच्या सर्व सदस्यांच्या मदतीने या किल्ल्याची उभारणी करण्यात आली आहे. कल्याण पश्चिमेतील समाजसेवक सचिन मारुती शिरसाट यांनी या किल्ल्याला भेट देत किल्ल्यांच्या सर्व गुफा, बुरुज, योग्य ठिकाणी योग्य मावळा असे परीक्षण करत ओमकार चे कौतुक केले. सचिन शिरसाट गेल्या बारा वर्षापासून दिवाळीच्या पार्श्वभूमीवर विविध किल्ले तसेच रांगोळी स्पर्धा ठेवतात त्यावर शिरसाठ हे आकर्षक पारितोषिके देतात. येत्या शनिवारी आणि रविवारी रांगोळी तसेच किल्ल्याची पाहणी करून त्यांचे पारितोषिक ठरविण्यात येणार असल्याचे शिरसाठ यांनी सांगितले आहे. याच सोबत ओमकार ने बनवलेला सिंहगड शहरातील कलाप्रेमी व शिवप्रेमींसाठी पर्वणीच ठरणार आहे, प्रतीक आणि आपल्या कुटुंबासह या कलाकृती ला भेट देऊन छत्रपतींच्या आठवणींना उजाळा द्यावा असे आवाहन सचिन शिरसाट यांनी केले आहे. परीक्षण वेळी ओमकार ने नागरिकांना संपूर्ण किल्ल्याची माहिती सांगितली.

# खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या नेतृत्वाखाली भाजपाच्या पदाधिकाऱ्यांसह शिवसेनेत जाहीर प्रवेश



**कल्याण (प्रतिनिधी) :** कल्याण ग्रामीण व १४ गावातील देसाई, सोनारपाडा, पडलेगाव, आगासन, काटई मधील मनसे, राष्ट्रवादी आणि भाजपाच्या पदाधिकाऱ्यांसह शेकडो कार्यकर्त्यांनी खासदार डॉ श्रीकांत शिंदे यांच्या नेतृत्वाखाली अर्जुन पाटील, उपजिल्हाप्रमुख भरत भोईर, नगरसेवक महेश गायकवाड यांच्या उपस्थितीत शिवसेनेत जाहीर प्रवेश केला आहे.

यावेळी देसाई मधील जय मल्हार ग्रुप चे रोहिदास लक्ष्मण म्हात्रे देसाई, नरेश मधुकर ठाकूर सोनार पाडा, तुकाराम चिंतामण म्हात्रे पडलेगाव, संजय म्हात्रे, दशरथ विष्णू म्हात्रे, गुलाम लक्ष्मण म्हात्रे, बबलू सुदाम म्हात्रे, यांच्यासह शेकडो कार्यकर्ते यांचा आज शिवबंधान बांधून शिवसेनेत आलेल्या सर्वांचे खासदार डॉक्टर श्रीकांत शिंदे यांनी स्वागत केले. शिवसेनेची वाटचाल समाज भिमुख राहिली असून सध्या महा विकास आघाडीच्या माध्यमातून मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या कामगिरीवर विश्वास ठेवून शिवसेनेकडे ओढ वाढला असून. भविष्यात देखील आम्ही याच प्रकारे शिवसेनेची कार्य करत राहू आणि शिवसेनेची ध्येय धोरणे आणि राज्य सरकारची कामे जनतेपर्यंत पोहोचविण्याचे कार्य करणार असल्याचे आव्हान प्रवेश करत्यांनी स्वीकारले.

# डाक विभागाकडून विशेष लिफाफा



**भिवंडी :** जे भावना बोलून दाखवू शकत नाहीत, अशा चिमुरडयांना बोलतं करण्याचे, त्यांच्या कलागुणांना वाव देण्याचे काम तब्बल पंचवीस वर्षे श्री नाकोडा कर्णबधिर विद्यालय करीत आहे. हे कार्य खऱ्या अर्थाने समाजाची निस्वार्थ सेवा आहे, म्हणूनच या कार्याचा गौरव भारतीय डाक विभागाने केला असल्याचे प्रशंसोद्‌गार भारतीय पोस्ट व डाक विभागाच्या विभागीय संचालिका सरन्या यु यांनी काढले. त्या सरवली एमआयडीसी येथे शाळेच्या सभागृहात आयोजित विशेष पोस्ट लिफाफा अनावरण प्रसंगी बोलत होत्या.

याप्रसंगी कस्टम व सर्व्हिस टॅक्स विभागाचे निवृत्त मुख्य आयुक्त सुशील सोळंकी, राजस्थान सुमेरपूर येथील भगवान महावीर रुग्णालयाचे अध्यक्ष जयंत जैन, सेलो ग्रुप ऑफ कंपनीच्या संगीता राठोड, संस्थेचे अध्यक्ष पुष्पराज जैन, सचिव गगन जैन, यांसह असंख्य मान्यवर उपस्थत होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी शाळेतील विद्यार्थ्यांनी विविध कलाकृती सादर करुन उपस्थितांची मने जिंकली. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक विश्वस्त सुरेंद्र जैन यांनी केले तर सुत्रसंचालन आनंद खतन यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी संस्थेचे विश्वस्त अनिल जैन, मुख्याध्यापिका मुग्धा कुलकर्णी व शिक्षक, कर्मचारी यांनी विशेष मेहनत घेतली.

# स्वर्गीय अरविंद इनामदार यांचा स्मृतिदिन साजरा



**कल्याण (प्रतिनिधी) :** स्वर्गीय अरविंद इनामदार (माजी पोलीस महासंचालक महाराष्ट्र राज्य )यांच्या द्वितीय स्मृतिदिनानिमित्त लोक कल्याण प्रतिष्ठान चे अध्यक्ष सागर भालेकर यांनी गरजूंना फळ, अन्न, ब्लॅकेट व गृहउपयोगी समानांचे वाटप केले.

कार्यक्रमास अध्यक्ष माजी पोलीस आयुक्त भुजंगराव मोहिते, मुंबई पोलीस उपायुक्त संजय पाटील, निवृत्त पोलीस उपायुक्त अरुण जाधव, माजी आमदार प्रकाश भोईर, माजी नगरसेवक वरुण पाटील, मनसे चे राज्य सचिव इरफान शेख, उद्योजक राजेश रुपावत, मनसे शहर उपाध्यक्ष गणेश चौधरी, नंदकुमार देशमुख, रोहन पवार, विठ्ठल सानप हे उपस्थित होते.

भुजंगराव मोहिते यांनी आपले मनोगत व्यक्त करतांना सांगितले की अरविंद इनामदार यांनीच त्यांना घडवले. त्यांच्या काळात मोक्का ताडा सारखे कायदे बनले.शिस्तप्रिय अधिकारी म्हणून त्यांचा लौकिक होता. कार्यक्रमाचे आयोजन केल्या बद्धल सागर भालेकर आणि विठ्ठल सानप यांची प्रशंसा केली.

सदर कार्यक्रमास अंध व गरजू नागरिक उपस्थित होते. अंधांच्या संघटनेला भुजंगराव मोहिते यांनी पाच हजार रुपयाचा धनादेश भेट दिला.

# डोंबिवलीत क्रिएटिव्ह ॲकॅडमीची नवी सुरुवात

**डोंबिवली (प्रतिनिधी) :** डोंबिवली पश्चिम येथे क्रिएटिव्ह ॲकॅडमीची नवीन शाखा तीन शिक्षक भागीदारांद्वारे आयोजित केले जाईल. या वर्गाच्या उद्‌घाटनासाठी डॉ. भारतभूषण शर्मा प्राचार्य वर्गाचे महत्व सांगितले.

मंचाचे सूत्रसंचालन जागतिक विक्रमधारक प्रा. डॉ.दिनेश गुप्ता यांनी केले. दिले. कोरोनानंतर वाचन आणि शिकवण्याच्या पद्धतीत बदल झाला आहे. हा नवा बदल स्वीकारून तो





सुरु करण्यात आली. जाणून घ्या, क्रिएटिव्ह ॲकॅडमी हे अमरावतीमधील एक प्रसिद्ध कोचिंग सेंटर आहे. हे कमलेश त्रिपाठी, मनोज पांडे आणि राजेश शुक्ला या केळकर महाविद्यालय यांना आमंत्रित करण्यात आले होते. या नवीन डोंबिवली शाखेचे उदघाटन त्यांच्या कमळाच्या पायांनी झाले व स्वत:च्या अनुभवातून त्यांनी त्यांनी आपल्या खास शैलीने सर्वांना प्रेरित केले. क्रिएटिव्ह अकादमीचा मुख्य उद्देश तिन्ही भागीदारांनी सामायिक केला होता. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला त्यांनी प्राधान्य विद्यार्थ्यांवर लक्ष केंद्रित करणार आहे. असे प्रतिपादन यावेळी करण्यात आले. या सोहळ्यात १०० हून अधिक लोकांनी उपस्थिती नोंदवली.

# सलीम शेख यांच्या अध्यक्षतेखाली आढावा बैठकीचे आयोजन

**कल्याण (प्रतिनिधी) :** कल्याण मध्ये काझी चौक कोळीवाडा रिक्षा स्टेन्ड जवळ कल्याण



डोंबिवली शहर जिल्हा काग्रेस कमिटी अल्पसंख्याक विभाग यांच्याकडून येणाऱ्यास आगामी महानगरपालिका निवणुक लक्षात घेवून सहावी आढावा बैठकिचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी जिल्हा काग्रेस अल्पसख्याक विभाग कमिटी चे अध्यक्ष सलीम शेख यांनी कार्यकत्यांना निवडणुकीच्या संदर्भातील माहिती व मार्गदर्शन केले आणि येणाऱ्या विधानसभामध्ये आपल्याच आमदार निवडून येणार असल्याचा विश्वास दर्शवला आणि त्या पद्धतीने आपण सर्व मिळून कामकाज करावे असे आवाहन केले.

यावेळी अल्पसंख्याक विभाग जिल्हाउपाध्यक्ष शिफा मशहर, संगीता नाईक नवरे, समशेर खान, फिरोज सय्यद, रोमन खटखटे, फराना शेख, मंदा कवाड, नाजिया शेख, चांद सय्यद, नूर मोहम्मद शेख, श्यामो पठाण, सवालिया खान, रंजना वाघमारे, आसमा पठाण, श्री मुहावरे, हरशद खान तसेच मोठ्या संख्येने कार्यकर्ते पदाधिकारी यावेळी आढावा बैठकीला उपस्थित होते.

# लसीचा एकही डोस न घेतलेल्या नागरिकांना टीएमटीच्या बसमध्ये प्रवेश नाही



**ठाणे :** ठाण्यातून कोरोनाचे उच्चाटन करण्यासाठी महापालिका प्रशासन प्रभावीपणे व्यापक मोहिम राबवित आहे. लस हा एकमेव उपास असून ज्यांनी लस घेतली नाही त्यांच्या माध्यमातून इतर नागरिकांना प्रादुर्भाव होवू शकतो या पार्श्वभूमीवर नागरिकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने व खबरदारीचा उपाय म्हणून ठाणे महापालिकेच्या परिहवन सेवेच्या बसमध्ये लसीचा एकही डोस न घेतलेल्या प्रवाशांना प्रवेश निषिध्द करण्याचा महत्वपूर्ण निर्णय महापौर नरेश म्हस्के व आयुक्त डॉ. विपिन शर्मा यांनी घेतला असून याची अंमलबजावणी लवकरच करण्यात येणार आहे.

# प्रतिक पाटील यांच्या पाठपुराव्याने रस्त्याच्या कॉंक्रीटीरणाच्या कामाचा शुभारंभ

## डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या हस्ते भुमिपूजन करण्यात आले

**डोंबिवली (प्रतिनिधी) :** कल्याण तालुका युवा अधिकारी प्रतिक पाटील हे आपल्या वार्डातील नागरिकांच्या हितासाठी नेहमीच तत्पर असतात. तसेच विकासकामांसाठी केंद्राकडे सतत पाठपुरावा करणारे कल्याण लोकसभेचे शिवसेनेचे लोकप्रिय खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांनी दि १० नोव्हेंबर २०२१ रोजी डोंबिवलीत ठिकठिकाणी विकास कामांचा शुभारंभ केला.

खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांनी जाहीर केलेल्या २० लाख निधीतून प्रभाग क्रमांक ८१ मधील गांधीनगरमध्ये सुभाष डेअरी जवळ संत ज्ञानेश्र्वर मार्ग न्यू प्रवीण सोसायटी ते श्रीपाद छाया सोसायटी जवळील रस्त्याचे कॉंक्रीटीकरण करण्याच्या कामाचा शुभारंभ व भूमिपूजन करण्यात आले. त्याचबरोबर प्रभाग क्रमांक ८१ गांधी नगर मधील



शिवसेना युवासेना जनसंपर्क कार्यालयात येऊन भेट दिली. याबद्दल कल्याण तालुका युवा अधिकारी प्रतिक पाटील यांनी आभार मानले.

या वेळी शिवसेनेचे सर्व कार्यकर्ते, पदाधिकारी, जेष्ठ शिवसैनिक, युवासेनेचे सर्व कार्यकर्ते, पदाधिकारी आणि महिला आघाडीचे सर्व महिला कार्यकर्त्या आणि पदाधिकारी उपस्थित होते.

# भिवंडी ग्रामीण भागातील ३४ गावांच्या पाणी प्रश्नासंदर्भात जिल्हाधिकारी कार्यालयात बैठक

**कल्याण :** ठाणे स्टेम प्रकल्पाद्वारे भिवंडी तालुक्यातील ३४ गावांना ठाणे महानगरपालिकेचे सहआयुक्त संदीप माळवी, स्टेम प्रकल्पाचे गावांना पाणीच पोचत नाही तर काही गावांना अपुरा पाणी पुरवठा होतो. या



गावांना पुरेशा प्रमाणात व योग्य दाबाने पाणी पुरवठा होण्यासाठी स्टेम प्रकल्पाच्या महाव्यवस्थापकांनी येत्या आठ दिवसात पाहणी करून होणारा पाणीपुरवठा सुरळीत करण्यासाठी तातडीने पाहणी करून उपाय योजना करण्याचे निर्देश केंद्रीय पंचायत राज राज्यमंत्री कपिल पाटील यांनी आज येथे दिले.

भिवंडी तालुक्यातील ग्रामीण भागातील ३४ गावांच्या पाणी प्रश्नासंदर्भात आज जिल्हाधिकारी कार्यालयाच्या नियोजन भवनात पाटील यांच्या अध्यक्षतेखाली बैठक झाली. त्यावेळी ते बोलत होते. अपर जिल्हाधिकारी वैदेही रानडे, उपजिल्हाधिकारी (सामान्य) गोपीनाथ ठोंबरे, जिल्हा नियोजन अधिकारी सुनील जाधव, महाव्यवस्थापक संकेत घरत यांच्यासह ३४ गावांचे सरपंच व लोकप्रतिनिधी उपस्थित होते.

केंद्रीय राज्यमंत्री श्री. पाटील म्हणाले की, स्टेम पाणी पुरवठा योजना सुरू झाल्यापासून त्याचा विस्तार झाला नाही. आजही भिवंडी तालुक्यातील ३४गावांमध्ये अपुरा पाणीपुरवठा होतो. तसेच या योजनेद्वारे ३४ गावांसाठी ४१ एमएलडी पाणी आरक्षित असताना केवळ ११ एमएलडी पाणी देण्यात येते. हे पाणीही नियमित नसल्यामुळे या गावांमध्ये तीव्र पाणी टंचाई निर्माण होऊन महिलांना अडचणी निर्माण होतात. काही उपाययोजना करावेत.

स्टेम प्रकल्पातील ३४ गावांना अपुरा पाणी पुरवठा होत असतानाही पाणी देयके मात्र मोठ्या प्रमाणात येतात. तसेच थकीत देयकांवर व्याज लावले गेले आहे. हे व्याज माफ करण्यासंदर्भात विचार करण्यात यावा. गावापर्यंत पाणी आल्यानंतर अंतर्गत वितरणाची व्यवस्था ठाणे जिल्हा परिषदेने करावी. तसेच जलजीवन मिशनमधून या प्रकल्पासाठी निधी उपलब्ध करून देता येईल का याचाही विचार करावे, असेही श्री. पाटील यांनी यावेळी सांगितले.

# ‘हर घर दस्तक’ या मोहिमेअंतर्गत महापालिका परिसरात आता पर्यंत ४५,९०१ कोविड लसीकरणाचा टप्पा पूर्ण !





**कल्याण (प्रतिनिधी) :** महानगरपालिका क्षेत्रात आत्तापर्यंत ९,२१,८८९ नागरिकांनी कोविड लसीकरणाचा लाभ घेतला असून एकूण ५,२६,४६२ नागरिकांनी लसीकरणाचे दुसरी मात्रा घेतली आहे. एकूण १४,४८,३५१ इतका लसीकरणाचा टप्पा महापालिकाने आतापर्यंत पार केला आहे कोविड रुग्ण संख्येवर जास्तीत जास्त नियंत्रण ठेवण्याच्या दृष्टिकोनातून महानगरपालिकेने कोविड लसीकरणासाठी शासनाच्या निर्देशानुसार ‘कवच-कुंडल मिशन’ आणि ‘युवा स्वास्थ कोविड मिशन’ अशा योजना महानगरपालिका क्षेत्रात राबवून जास्तीत जास्त लोकांचे लसीकरण व्हावे या दृष्टीने आपला प्रयत्न सुरु ठेवला आहे आणि आता ‘हर घर दस्तक’ या कोविड लसीकरण मोहिमेअंतर्गत लसीकरणा पासून वंचित राहिलेल्या नागरिकांचे सर्वेक्षण करुन त्यांच्यात लसीकरणा विषयी जनजागृती करुन त्यांचे लसीकरण करुन घेण्यासाठी प्रवृत्त करण्यात येत आहे. या ‘हर घर दस्तक’ मोहिमे अंतर्गत मध्ये आतापर्यंत ७,६९५ नागरिकांनी कोविड लसीकरणाची पहिली मात्रा, ३८,२०६ नागरिकांनी कोविड लसीकरणाची दुसरी मात्रा घेतली असून एकूण ४५,९०१ कोविड लसीकरण या मोहिमेअंतर्गत पार पडले आहे.

तरी ‘हर घर दस्तक’ या मोहिमेअंतर्गत आपल्या घरापर्यंत येणाऱ्या महानगरपालिकेच्या आरोग्य पथकास, लसीकरणापासून वंचित राहिलेल्या आपल्या घरातील आप्तेष्टांची माहिती देऊन सहकार्य करावे असे आवाहन महानगरपालिके मार्फत करण्यात येत आहे.

# दिपा जोशी यांनी दिले सेल्फ-डिफेन्स ट्रेनिंग प्रशिक्षण

**कल्याण :** आजच्या काळात महिलांनी अभ्यास आणि नोकरीसाठी घराबाहेर पडणे अनिवार्य झाले आहे आणि आपल्याला माहित



आहे की बोलण्याने कधीही अप्रिय घटना घडत नाहीत, म्हणून आपण ते टाळू शकत नाही. पण या स्वसंरक्षण तंत्राने तुम्ही त्यामुळे होणारे नुकसान कमी करू शकता. रस्त्याच्या कडेला चालत असताना, बस किंवा टॅक्सीमधून प्रवास करताना किंवा स्वत:च्या घराच्या परिसरात, कधीही आणि कुठेही, कोणताही असामाजिक घटक महिलांच्या सुरक्षिततेला आणि पावित्र्याला हात घालू शकतो, अशा परिस्थितीत, महिलांना स्वत:ला सशक्त करण्यासाठी पावले उचलणे अत्यंत महत्त्वाचे आहे. smartbyte संगणक प्रशिक्षण केंद्र संचालिका दीपा जोशी यांनी आयोजन केले होते. अपराजिता (सेल्फ-डिफेन्स ट्रेनिंग) कार्यक्रम मुलींना आनंद सर आणि त्यांच्या टीमने स्वत:ला सक्षम करण्यासाठी प्रशिक्षण दिले. प्रमुख पाहुणे ए.आय. स्वाती कांदळकर मॅडम आणि ज्येष्ठ अधिवक्ता अर्चना सबनीस या मान्यवरांनी उपस्थित राहून मुलींच्या सक्षमीकरणासाठी पावले उचलण्यासाठी प्रोत्साहन दिले.

नियमित वाचा
कल्याण डोंबिवली व्हिजन

# कल्याण पूर्वेत नागरिकांचे जिभेचे चोचले पुरविण्याकरिता एक नवीन वेबसाईट सज्ज

**कल्याण (प्रतिनिधी) :** तुम्हाला कदाचित Swiggy Zomato ठाऊक असेल. परंतु आता आपल्या जीभेचे चोचले पुरवण्यासाठी आपल्या कल्याण पूर्वेत रविवारी श्रनेीजप विवके नावाची एक नवीन website नागरिकांच्या सेवेत रुजू झाली आहे. ही विवक बवउ. चंदल या आधी बदलापूर, डोंबिवली, नवी मुंबई, पुणे, नाशिक या ठिकाणी चालू झाली आहे. या विवक ब्वउ. चंदल मध्ये फक्त आणि फक्त महिलांनाच संधी देण्यात येत आहे, यामुळे ज्या महिला गृहिणी आहे व ज्या महिला




स्वयंपाकात सुगरण आहेत. त्यांना या कंपनीत आपल्या हाताची चव सर्वांना देता येइल. या वेबसाईटचे संचालक विक्रम मुटके, कार्यक्रमाचे आयोजक वंदना मोरे, मुंबई विभाग प्रमुख प्रतिभा सत्तेरे, कल्याण सिटी हेड दीप्ती नायडू, प्रकल्प सहाय्यक सुवर्णा इस्वलकर उपस्थित होते. तसेच यावेळी कल्याण पूर्वचे आमदार गणपत गायकवाड, जिल्हाध्यक्षा रेखा चौधरी, कल्याण पूर्व मंडळ महिला मोर्चा अध्यक्षा प्रिया जाधव, महिला मोर्चा सरचिटणीस निशा सिंग, कल्याण पूर्व मंडळ अध्यक्ष संजय मोरे आदी भाजपाचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# कल्याण पूर्वेतील विकासकामे कुलूपबंद

## सुविधांचा ताबा घेण्यास संस्था, व्यक्ती पुढे येत नसल्याने वास्तू वापराविना

**कल्याण :** कल्याण पूर्वेतील रहिवाशांना घराजवळ पुरेशा नागरी सुविधा असाव्यात या उद्देशातून खासदार, आमदार यांच्या विकास निधीतून ज्येष्ठ नागरिक कट्टा, वाचनालय आणि सार्वजनिक स्वच्छतागृहे बांधून पूर्ण करण्यात आली आहेत. या सुविधांचा ताबा घेण्यास संस्था, व्यक्ती पुढे येत नसल्याने त्या कुलूपबंद आहेत.




या वास्तू रहिवाशांना खुल्या करून दिल्या तर नियंत्रक नसल्याने येथे गैरप्रकार होण्याची भीती आहे. ज्येष्ठ नागरिक कट्टा, वाचनालय आणि स्वच्छतागृह या कामांसाठी खा. डॉ. श्रीकांत शिंदे, आमदार गणपत गायकवाड यांनी आपल्या विकास निधीतून एकूण ५७ लाखांचा निधी उपलब्ध करून दिला आहे. कल्याण पूर्वेतील ‘ड’ प्रभाग कार्यालयासमोर मध्यवर्ती ठिकाणी ज्येष्ठ नागरिक कट्टा, वाचनालय आहे. त्याच्या बाजूला स्वच्छतागृह बांधण्यात आले आहे. ज्येष्ठ नागरिक कट्टा, क्रांतिकारक स्मारकासाठी आ. गायकवाड यांनी सात लाख रुपये निधी उपलब्ध करून दिला. या कट्ट्याचे जानेवारीमध्ये उद्घाटन करण्यात आले. या कट्ट्याचा ताबा घेण्यास कोणतीही संस्था, ज्येष्ठ नागरिक संघाचे सदस्य तयार नसल्याने या वास्तुला टाळे आहे.

याच जागेतील वाचनालय, अभ्यासिकेच्या वास्तूसाठी खा. डॉ. शिंदे यांनी १५ लाख, आ. गायकवाड यांनी २५ लाखांचा निधी उपलब्ध करून दिला. चार महिन्यांपूर्वी या वास्तूचे लोकार्पण करण्यात आले. लाखो रुपये खर्च करून या तिन्ही वास्तूंना टाळे लागले आहे. स्वच्छतागृह बांधण्यापूर्वी त्याच्या आसपास किती शौचालये आहेत याची चाचपणी करणे आवश्यक होते, असे या भागातील रहिवाशांनी सांगितले.स्वच्छतागृह ‘पैसे द्या आणि वापरा’ या तत्त्वावर एका ठेकेदाराला चालविण्यास दिले होते. या ठिकाणी दिवसभरात जेमतेम ३० रुपयांचाही व्यवसाय होत नाही. या स्वच्छतागृहापासून १०० मीटर अंतरावर मोफत वापराची दोन स्वच्छतागृह आहेत. नवीन स्वच्छतागृहासाठी ठेकेदार मिळविण्यासाठी प्रशासन प्रयत्न करते. त्याला प्रतिसाद मिळत नाही, अशी माहिती नगरसेविका मंढारी यांनी दिली. ‘वाचनालयाच्या वास्तूत काम सुरु आहे. ज्येष्ठ नागरिक कट्टा स्थानिक रहिवासी किंवा ज्येष्ठ नागरिकांनी चालविण्यास घेतले पाहिजे. यासाठी प्रशासन सहकार्य देण्यास तयार आहे. कोणीही ज्येष्ठ नागरिक कट्ट्याची जबाबदारी घेण्यास तयार नाही. या वास्तू अशाच खुल्या ठेवल्या तर तेथे गैरप्रकार होण्याची शक्यता आहे.

# समाजमाध्यमावरील चर्चेला बळी पडून अल्पवयीन मुलाचे पलायन?

**बदलापूर (प्रतिनिधी) :** बदलापूर शहरातील पूर्व भागात राहणारा एक १३ वर्षीय मुलगा रविवारी ‘वर्षभराने घरी येतो’ असे सांगत घराबाहेर पडला. रात्री उशिरापर्यंत तो घरी न आल्याने मुलाच्या आईवडिलांनी बदलापूर पूर्व पोलीस ठाण्यात याबाबतची तक्रारही दिली. मुलाचा एक मित्र त्याच्याबरोबर एका संकेतस्थळावरील चर्चा मंचावर सदस्य असल्याची माहिती पोलिसांना तपासादरम्यान मिळाली. ‘रनअवे अ‍ॅण्ड गेट अ लाइफ’ असे या समूहाचे नाव होते. घरातून कसे पळून जावे या विषयावर या समूहात चर्चा होत होती. त्यातूनच मुलगा पळून गेला असण्याची शक्यता पोलिसांनी व्यक्त केली.



रविवारी या मुलाने गोवा गाठल्याचे पोलीस तपासात समोर आले. हा मुलगा गोव्याच्या कलंगुटजवळ सापडला. गोव्यावरून मंगळवारी रात्रीपर्यंत मुलाला बदलापुरात आणले जाईल. त्यानंतरच हा सर्व प्रकार कसा झाला याबाबत माहिती मिळेल, अशी माहिती बदलापूर पोलिसांनी दिली आहे. याप्रकरणी बदलापूर पूर्व पोलीस ठाण्यात अपहरणाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# राहुल पाटील यांच्याकडून छटपुजेनिमित्त भाविकांसाठी नाश्त्याची सोय

**कल्याण (प्रतिनिधी) :** छट पूजेसाठी सलग दोन दिवस आमचे कार्यकर्ते भाविकांच्या सुरक्षेसाठी अडवली गणेश घाटावर तैनात आहेत. डोंबिवलीत छठ मातेचा पवित्र सण साजरा करण्यात आला, त्याचप्रमाणे कल्याणच्या आडवली गणेश घाटावर छठवर्तींनी सूर्यदेवाची पूजा केली.पाटील यांनी स्वत:च्या हाताने लोकांना नाश्ता वाटला. राहुलदादा पाटील यांनी पत्रकारांना सांगितले की, आडवली गणेश घाट तलावावर छठपूजेसाठी येणाऱ्या भाविकांच्या सुरक्षेसाठी मी आणि त्यांचे कार्यकर्ते तलावाभोवती तैनात आहेत, त्यामुळे घाटावर कोणतीही दुर्घटना घडत नाही, तसेच राहुलदादा पाटील यांनी ही माहिती दिली.



# धर्मराज फाऊंडेशन महोत्सवाचे उदघाटन आमदार रवींद्र चव्हाण यांच्या हस्ते सपन्न

**डोंबिवली :** निळजे,लोढा,पलावा महोत्सवाचा उदघाटन सोहळा दिमाखदार पध्दतीन महाराष्ट्र राज्यमंत्री आमदार रवींद्र चव्हाण यांच्या हस्ते सपन्न झाला. प्रबोधनात्मक कार्यक्रम होणार आहेत.



पहिल्या दिवशीच्या महोत्सव उदघाटन प्रसंगी मा राज्यमंत्री आमदार श्री रवींद्र चव्हाण साहेब,लक्ष्मण पाटील कल्याण जिल्हा अध्यक्ष भाजपा (वइब) नंदु जोशी डोंबिवली पूर्व मंडळ अध्यक्ष,भालचंद्र बेडेकर,शशिकांत बेडेकर,रवी थोरवे,रवींद्र पाटील,अरुण पाटील,जयेंद्र पाटील,चंद्रकांत भोईर,चंद्रकांत शिंदे,केतन पाटील,सागर पाटील,महादेव लोखंडे,सतिश सिंग,जय गोरे सदाशिव गुंडाळ,विलास जाधव,अजित सिंग, मयुरेश चुरी,भानुदास पाटील,सागर मोहिते,सचिन तारी,गणेश भोईर,प्रकाश चौगुले,हेमंत राठोड, ई. कृष्णमूर्ती आदी महोत्सव समितीचे कार्यकर्ते उपस्थित होते.

Printed, Published, Owned & Editor - Rajendra Shrawan Vakhare, Printed At SIDDHAKALA PRINT MEDIA & PUBLICATIONS PVT.LTD., PLOT. No. W-230, TTC Industrial Area, Khairne MIDC, Navi Mumbai-Dist. Thane. MAHARASHTRA - 400710 Published From - Flat No 219, First Floor, L.I.G. Blg No 16, Opp - Birla College Chickanghar, Kokan Vasahat, Kalyan (w), Taluka - Kalyan, Dist - Thane. Pin Code - 421 301 - (Maharashtra) Mob. 09987496136, 09619630035, 08655004586 (REGD.NO. MAHBIL/2014/56983 Email - kalyandombivlivision@gmail.com

हे मराठी साप्ताहिक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक श्री. राजेंद्र श्रावण वखरे यांनी सिध्दकला प्रिंट मिडीया, ॲण्ड पब्लिकेशन प्रा.लि.डब्ल्यू २३०, टीसीसी इंडस्ट्रियल एरिया खैरणे, एमआयडीसी ठाणे-बेलापूर रोड, नवी मुंबई -४००७१० जि. ठाणे - ४००७१०, येथे छापून फ्लॅट नं. २१९, पहिला मजला, एल.आय.जी. बिल्डींग नं. १६, बिर्ला कॉलेज समोर, चिकणघर, कोकण वसाहत, कल्याण (प.), ता. कल्याण, जि. ठाणे -४२१३०१ येथून छापून प्रकाशित केले (रजि. नं. एमएएचबीआयएल २०१४/५६९८३)